| MHNS240020242023 | संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७७२/२०२३<br>महाराष्ट्र शासन<br>वि.<br>किशोर बारकू बच्छाव |
| --- | --- |

## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५८ अन्वये

## निशाणी क्र. ०१ वरील आदेश.

अभियोजन पक्षाने सदर खटला दिनांक ०६.०९.२०२३ रोजी दाखल केला आहे. आरोपीविरुध्द वेळोवेळी समन्स काढले. आरोपीला हजर ठेवण्यास सरकार पक्ष व पोलिस प्रशासन संधी देउनही असमर्थ ठरले आहे. आजरोजी देखील आरोपी हा गैरहजर आहे. खटला दाखल दिनांका पासून आजरोजी पर्यंत अभियोजनपक्षाला संधी देवुनही ते अद्याप आरोपी हजर ठेवु शकले नाही. त्यामुळे सदर खटला न्यायाच्या दृष्टीने व मौल्यवान वेळेच्या दृष्टीने प्रलंबित योग्य ठरणार नाही. तसेच खटला दाखल दिनांका पासून आजरोजी पर्यंत अभियोजनपक्षाने अद्याप रासायनिक परिक्षण अहवाल अभिलेखावर सदर केलेला नाही. रासायनिक परिक्षण अहवालाशिवाय आरोपीवरील अपराध सिध्द होवू शकत नाही. सद्य परिस्थती मध्ये खटल्याचे संपरीक्षा घेतली तरी त्याचा काहीच उपयोग होणार नाही. सबब, खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

सं. फौ. ख. क्र.७७२/२०२३

# आ दे श

१. आरोपीस महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम, १९४९ चे कलम ६५(ई) अन्वये दंडनिय अपराधा मधून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५८ अन्वये दोषमुक्त करण्यात येते व खटला थांबविण्यात येतो.

२. सदर गुन्हयामधील जप्त मुद्दे मालाची नियमानुसार विल्हेवाट लावावी.

UDAY PRAKASH HINGMIRE
Digitally signed by UDAY PRAKASH HINGMIRE
Date: 2026.03.23 16:09:31 +0530

**ठिकाण – सटाणा** **( यु. पी. हिंगमिरे )**

**दिनांक– १०.०३.२०२६** **प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी सटाणा.**